**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 08-08-2025**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-08-08 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-08-09 | 2025-08-10 | 2025-08-11 | 2025-08-12 | 2025-08-13 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 7.5 | 13.5 | 4.2 | 10.9 | 16.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.5 | 29.7 | 30.6 | 30.8 | 30.5 |
| किमान तापमान (अं.से) | 24.2 | 24 | 23.9 | 24.1 | 24.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 90.5 | 91.5 | 91 | 91.6 | 92.4 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 65.5 | 64.9 | 63 | 64.2 | 68.8 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 4.5 | 4.3 | 4.4 | 5.7 | 6.4 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 256 | 228.3 | 279.5 | 304.7 | 296.6 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 6 | 6 | 7 | 8 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०९ ते १३ ऑगस्ट २०२५ दरम्यान आकाश मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०९, १०, ११ व १२ ऑगस्ट २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ०९, १०, ११, १२ व १३ ऑगस्ट, २०२५ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील ५ दिवसांमध्ये विदर्भामध्ये कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस ने घट होईल. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक १३ ते १९ ऑगस्ट २०२५ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता, कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• जिल्ह्यात पुढील ४ दिवसानंतर सार्वत्रिक स्वरूपाच्या पावसाची, मेघगर्जना, विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, धान रोवणी, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे पुढील ३ ते ४ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थीतीचा अंदाज लक्षात घेऊन उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. • धान किंवा ईतर रोपांची पुनर्लागवडीच्या कामी शेतकरी व शेतमजुरांना जास्त संख्येने एकत्रित काम करणे टाळावे, शेतीतील अत्यावश्यक कामे करताना दोन शेतमजुरांमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे. अशा कामाच्या वेळी विजांच्या ठिकाणचे निरीक्षण करण्यासाठी दामिनी लाईट निंग अलर्ट या मोबाईल app चा वापर करावा. वीज प्रवण क्षेत्रात असल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. • अत्यावश्यक कृषी रसायनांच्या फवारणीची कामे सध्याच्या पावसाच्या उघडिपीनंतर स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परीस्थिती असताना करावी. • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच

पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| तूर | • तूर उत्पादन वाढीसाठी शेंडा खुडणी फायदेशीर :- पेरणीनंतर साधारण ४० ते ४५ दिवसांनी पहिली शेंडी खुडणी करावी, दुसरी शेंडा खुडणी ६० ते ६५ दिवसांनी करावी जेणेकरून अधिक फुटवे व उपफांद्या येतात. शेंडा दोन ते तीन इंच खुडावा याकरिता शेतकऱ्यांनी हातानी खुडणी करावी. खुडणी झाल्यानंतर स्फुरद अन्नद्राव्य दिल्यास फुलोरा आणि शेंगाची लागवणही होऊन उत्पादनात चांगली वाढ होते. |
| भात | • मित्र किडींच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू व चवळी पिकाची लागवड करावी. • रोपवाटीका:- खोडकिडा व गादमाशीच्या व्यवस्थापनाकरिता कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५ किलो ग्रॅम प्रति हेक्टर (कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका) रोपकाढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे. • रोवणीपूर्वी रोपांची मुळे क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही @१० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात तयार केलेल्या मिश्रणात १२ तास बुडवून ठेवावीत व नंतर रोवणी करावी. • धान रोपवाटीका तण विरहीत ठेवावी. • धान बांधावर झेंडूची सापळा पिक म्हणून लागवड करावी. • रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसूद्धा बाहेर पडतील. • गराडीची पाने १.५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात चिखलनीचे वेळी शेतात टाकावीत, यामुळे गादमाशी, तुडतुडे आणि खोडकिडीचा प्रादुर्भाव सुद्धा कमी होतो. • तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची लावणी शिफारसीत अंतरावर (२० x १५ किंवा २० x २० सें.मी.), पट्टा पद्धतीने लागवड करावी (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी). • रासायनिक खते:- जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. • १) उगवणपूर्व :- पेंडीमेथालिन ३० % ई. सी. @५० मिली रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात किंवा प्रेटिलाक्लोर ५० % ई. सी. @ २० ते ३० मिली रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात किंवा पायराझोसल्फुरॉन इथाइल १०% डब्ल्यु.पी. @ २ ते ३ ग्रॅम रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कपाशी | • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे. • डवरणी आणि खुरपनीची कामे शक्यतो सकाळच्या वेळी करावी. प्रभावी तन व्यवस्थापनासाठी तन २ ते ३ पानावर असताना तन नाशकाचा वापर करावा. • पिक उगवणीनंतर तन व्यवस्थापनासाठी, रुंद पानाच्या तन नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम १० % ईसी १२.५ मिली ते १५ मिली प्रती १० लिटर पाणी किंवा गवतवर्गीय प्रकारच्या तन नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाइल ५ % ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना फवारणी करावी. • पिक उगवणीनंतर रुंद व अरुंद पानाच्या तन व्यवस्थापनासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६ % ईसी + क्विझालोफॉप इथाइल ४ % ईसी २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • बागायती संकरीत कपाशीला नत्राची पहिली मात्रा ४० किलो नत्र (९० किलो युरिया प्रती हेक्टर) तर कोरडवाहू संकरीत कपाशीला नत्राची मात्रा ४५ किलो (९७.६५ किलो युरिया पप्रती हेक्टर) या प्रमाणात द्यावी. • कपाशी मध्ये रस शोषक किडीचे निरीक्षण करावे आणि लेबल क्लेम आधारित शिफारशीनुसार कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| सोयाबीन | • सोयाबीनमध्ये खोडमाशीचा प्रादुर्भाव आढळल्यास, शेतकऱ्यांना पूर्व-मिश्रित सूत्रीकरण थायामेथोक्साम १२.६०% + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ०९.५०% झेडसी @१२५ मिली/हेक्टर किंवा बेटासायफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड @३५० मिली/हेक्टर किंवा आयसोसायक्लोसेराम ९.२ WW DC (१० % W/V) DV @६०० मिली/हेक्टर या प्रमाणात फवारणी करावी.. • सोयाबीनमध्ये चक्री भुंगा प्रादुर्भाव आढळल्यास, |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | लक्षणे दिसून येताच प्रादुर्भाव ग्रस्त झाडे नष्ट करावी. तसेच थायाक्लोप्रिड २१.७ एस.सी. (७५० मिली/हेक्टर) किंवा टेट्रानिलिप्रोल १८.१८ एस.सी. (२५०-३०० मिली/हेक्टर) किंवा क्लोरान्ट्रानिलिप्रोल १८.५०% एस.सी. (१५० मिली/हेक्टर) किंवा एमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% ई.सी. (४२५ मिली/हेक्टर) किंवा प्रोफेनोफॉस ५० ई.सी. (१ लिटर/हेक्टर) या पैकी कोणत्याही एका कीटक नाशकाची ची फवारणी करावी. (संदर्भ: एनएसआरआय, इंदूर) • तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीच्या (स्पोडोप्टेरा लिटुरा) च्या नियंत्रणासाठी, क्लोरँट्रानिलिप्रोल १८.५% एससी (१५० मिली/हेक्टर) किंवा स्पिनोटेराम ११.७ एससी (४५० मिली/हेक्टर) किंवा ईमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% ईसी (४२५ मिली/हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड २०% डब्ल्यूजी (२५०-३०० ग्रॅम/हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५% एससी (१५० मिली/हेक्टर) किंवा इंडोक्साकार्ब १५.८०% ईसी (३३३ मिली/हेक्टर), किंवा क्लोरोफ्लुआझुरॉन ०५.४०% ईसी (५०० मिली/हेक्टर) किंवा नोव्हॅल्युरॉन+इंडोक्साकार्ब ०४.५०% एससी (८२५-८७५ मिली/हेक्टर) किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/ली एससी (४२-६२ ग्रॅम/हेक्टर) यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन पिकामध्ये नियमित अंतराने शेताच्या ३ ते ४ ठिकाणी कीड/अळी चा प्रादुर्भाव तसेच त्यांच्या अवस्था या बाबतीत निरीक्षण करावे. यामुळे कीड नियंत्रणाचे उपाय राबविण्यासाठी मदत होईल. • सोयाबीन पिकामध्ये पिवळा मिझेक विषाणू या रोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशी या किडीच्या प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत.सोयाबीन पिकावरील पिवळा मोझेक विषाणू/सोयाबीन मोझेक विषाणू या विशानुजन्य रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास प्रादुर्भाव ग्रस्त झाडे/पिक अवशेष शेताबाहेर नष्ट करावे तसेच एसिटामिप्रिड २५ % + बायफेन्थ्रीन २५ % डब्ल्यूजी २५० ग्राम प्रती हेक्टर या प्रमाणात फवारणी करावी. • या व्यतिरिक्त पुर्वमिश्रीत शिफारशीत असलेल्या थायमिथोक्झाम + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटासायफ्लूथ्रीन + इमिडाक्लोप्रिड ३५० मिली प्रती हेक्टर या प्रमाणात फवारणी करावी. या द्वारे खोड माशीचे या किडीचे नियंत्रण होईल. • शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत |
| मुग | • मागील आठवड्यातील तापमानातील घट व उच्च आद्रता यामुळे मुग पिकावर भुरी भुरी रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास डिनोकॅप १० मिली किंवा पाण्यात मिसळणारे गंधक ३० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून शांत व स्वच्छ हवामान असताना फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | कोळी कीड नियंत्रणासाठी उपाययोजना: • जर २% फळे व १० % पाने कोळीमुळे प्रभावित दिसत असतील, तर ही "आर्थिक नुकसानीची पातळी" समजली जाते आणि या स्थितीत त्वरित नियंत्रणात्मक उपाययोजना राबवणे आवश्यक ठरते. • १. सेंद्रिय उपाय: अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा नीम तेल १० मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) (२%) २० मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी, • २. रासायनिक उपाय: कोळीचा प्रादुर्भाव दिसताच स्पायरोटेट्रामेंट (१५.३१% ओडी) ०.६ मि.ली. किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्लुपी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळुन फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते. • पाने खाणारी अळी (लेमन बटरफ्लाय) या किडीचे व्यवस्थापन: रोपवाटीकेमध्ये व लहान बगीच्यात झाडांवरील अळीच्या विभिन्न अवस्था हाताने जमा करून नष्ट कराव्यात. बेसिलस थूरीनजीएनसीस (बीटी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून अळीच्या सुरवातीच्या अवस्थेत १० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • रासायनिक उपायः अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस (२५ ई.सी.) २.० मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून अळीच्या सुरवातीच्या अवस्थेत १० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री आणि वाफसा आल्यानंतर भरून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये संत्र वर्गीय फळझाडांच्या कलमांची लागवड करावी. कलमा लावतांना कलमांचा डोळा १५ ते २० सेंमी उंचीवर असावा. कलमा लावण्यापूर्वी मुळांना मेफेनोक्झाम एम झेड-६८ २.५ ग्राम आणि कार्बेन्डाझीम ५० % डब्ल्यूपी १ ग्राम प्रती १ लिटर पाणी या प्रमाण द्रावण तयार करून बुडवून नंतर लावावीत. • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. दोन ओळीमधील मोकळ्या जागेत उडीद, मुग, सोयाबीन, भुईमुग इत्यादी पिकाची आंतरपीक म्हणून लागवड करावी. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. • नवीन नवतीवर सिट्रस सिला, मावा आणि नाग अळीचा प्रादुर्भाव सामान्यपणे दिसून येतो. या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट# ३० ईसी @ २० मिली किंवा थायमेथोक्झाम# २५ डब्ल्यूजी |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | @ ३.० ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड# १७.८ एसएल @ ५.० मिली तसेच कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी डायफेनथीयुरोन# ५० डब्ल्यूपी @ २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून नवतीच्या काळात स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास वरीलपैकी कोणत्याही किटक नाशकाची १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. (संदर्भ: डॉ. पंदेकृव्ही, अकोला व सिसीआरआय, नागपूर) |
| मिरची | • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. • मिरची पिकातील शेंडेमर या बुरशीजन्य रोग व्यवस्थापनासाठी प्रती एकरी अझोक्सिस्ट्रोबिन ११ % डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १८.३ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी २४०-२८० मिली २००-३०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • मिरची पिकातील ओली कुज (Wet rot) या बुरशीजन्य रोग व्यवस्थापनासाठी प्रती एकरी पिकॉक्सीस्ट्रोबिन ६.७८ % + ट्रायसायक्लाझोल २०.३३ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |